# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(स्थापना विभाग)

जाहिरात क्र. 216/ज.स./2017 दि. 21/ 09/2017

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या/अधिनस्त अचल मालमत्ताचे शासकीय अभिलेखात नोंद घेण्याकरीता प्रकरणाचा पाठपुरावा करण्याकरीता तसेच महापालिका मालमत्ताचा शोध घेवून अभिलेख तयार करण्याचे दृष्टीने खालील पदांवर महसुल विभागातील अनुभवी **सेवानिवृत्त तलाठी** यांची कंत्राटी स्वरुपाने प्रथम सहा माहिन्याचे मुदतीकरीता तलाठी संवर्गासाठी **रु. 10000/– प्रतिमहिना** मानधनावर प्रमाणे नियुक्ती करावयाची आहे.

थेट मुलााखतीकरीता पदांचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | वयोमर्यादा | अनुभव. |
|---|---|---|---|---|
| 1 | तलाठी | 04 | कमाल 70 वर्षे | महसुल विभागातील तलाठी पदावरुन सेवानिवृत्त |

**अर्हता :–**

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहीजे.

2) इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरीता दि. 09/10/2017 ला सकाळी 10.00 वाजता ते 11.00 वाजेपर्यंत नागपूर महानगरपालिका मुख्यालय येथील अति आयुक्त (III) यांचे कार्यालयात अर्जासह व अनुभवाबाबत आवश्यक कागदपत्रासह थेट मुलाखतीकरीता नोंदणी करावी. विहीत वेळेत नोंदणी न केल्यास मुलाखतीकरीता विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

3) उमेदवारांकरीता उपरोक्त पदासाठी थेट मुलाखतीकरीता येताना त्यावेळेस सादर करावयाचा अर्जाचा नमुना नागपूर महानगरपालिकेच्या वेबसाईट www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे. थेट मुलाखत असल्याने इतर मार्गाने अर्ज पाठविण्याची आवश्यकता नसल्याने असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व अशा अर्जाबाबत वेगळयाने कळविण्यात येणार नाही.

3) वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 09/10/2017 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

4) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती व **सेवानिवृत्तीचे प्रमाणपत्र सांक्षाकिंत** करून जोडयाव्या.

5) उपरोक्त पदांकरीता उमेदवार शारिरीक दृष्टया सक्षम असावा.

6) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

7) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने या निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही,

8) सेवानिवृत्त कर्मचा—यांचे शारीरिक, मानसिक व आरोग्याचे दृष्टीने सक्षम असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

9) महसुल विभागातील तलाठी पदावरुन **सेवेतुन निवृत्त झालेले कर्मचारी** उपरोक्त पदाकरीता अर्ज सादर करू शकतील.

**हस्ता/— अश्विन मुद्‌गल**
**आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

नागपूर.
दि. /09/2017

# महसुल विभागातील सेवानिवृत्त तलाठी पदाकरीता
# भरून द्यावयाचा अर्जाचा नमूना

फोटो

1. अर्जदाराचे नांव :— ..................................................................

2. पत्ता :— ..................................................................
..................................................................

3. जन्म दिनांक :— ..................................................................

4. दि. 01/ 09/2017 ला वय :— ..................................................................

5. शैक्षणिक पात्रता :— ..................................................................
..................................................................

6. महसुल विभागातील सेवानिवृत्त झालेल्या शासकीय /निम शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा इतर शासकीय संस्थेचे नाव :— ..................................................................
..................................................................
..................................................................
..................................................................

7. पदनाम व अनुभव :— ..................................................................
..................................................................

8. मोबाईल क्रमांक :— ..................................................................

स्वाक्षरी

वरील कागदपत्रे तपासली असून, ती बरोबर आहेत.

तपासणी कर्मचा—याची स्वाक्षरी